जा.क्र.मसंकें/प्रअवा/४२८/२०२३,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी,
दिनांक 29 AUG 2023

प्रति,
मा.प्रभारी अधिकारी,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विटापीठ दापोली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

**विषयः— वाकवली विभाग प्रक्षेत्रामधील नारळ बागेत व गांडूळखत प्रकल्प युनिट येथे ठेका पध्दतीने काम करण्याच्या जाहिरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी देणेबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्रावरील नारळ बागेत व गांडूळखत प्रकल्प युनिट येथे विविध कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. तरी याबाबतची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर **(www.dbskkv.org)** प्रसिध्द करावी ही विनंती.

**सोबतः—वरीलप्रमाणे**

आपला विश्वासू

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी

Scanned with OKEN Scanner

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. ता.दापोली,जि.रत्नागिरी.

जा.क्र./मसकें/प्रअवा/ ४२७ /२०२३. दिनांक 29 AUG 2023

# जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग या प्रक्षेत्रावर सन २०२३—२४ या आर्थिक वर्षात वाकवली विभागातील नारळ बागेत व गांडूळखत प्रकल्प युनिट येथे विविध कामे करणे नियोजित आहे. सदर नियोजित कामे दिनांक १५/०९/२०२३ ते २५/०३/२०२४ या कालावधीत ठेका पध्दतीने करणे गरजेची आहेत. सदर कामांचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशील<br>•नारळ बागेतील कामे:— २ हेक्टर नारळ बाग (१८७ झाडे) |
|---|---|
| १) | नारळ बागेतील झावळे जमा करणे, फळे गोळा करणे तसेच जमा केलेली झावळे गांडूळखताकडे वाहतूक करणे, नारळ फळे भांडारात जमा करणे, नारळ फळे सोलण्याचे काम करणे. |
| २) | नारळ बागेतील झाडांना फेब्रुवारी या महिन्यात खते देण्यासाठी झाडाच्या बुंध्यातील गवत काढणे, रिंगा करणे, खते देणे, रिंगा बुजविणे, झाडांना बोर्डोपेस्ट लावणे. |
| ३) | नारळ बागेतील केळी लागवडीमधील वाळलेली पाने कापणे, झाडांना मातीची भर घेणे. |
| ४) | नारळ बागेतील झाडांना तसेच आंतरपिक केळी यांना सुक्ष्म सिंचनाने पाणी देण्यासाठी पुर्वतयारी करणे त्यामध्ये लॅटरल ओढणे, दुरूस्ती व देखभाल करणे व पाणी देणे. (आक्टोंबर २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत) |
| ५) | नारळ बागेतील तयार नारळ फळांचा पाडा करणे. |
| ६) | **• गांडूळखत युनिट प्रकल्पाकडे २४ टन गांडूखत निर्मितीसाठी करावयाची कामे:—**<br>गांडूखत निर्मितीसाठी पालापाचोळा, सुके गवत, गवत ओले गवत, ग्लिरीसिडीया पाला इत्यादी बायोमास गोळा करणे. |
| ७) | सदर जमा केलेला बायोमास (पालापाचोळा, गवत) गांडूळखताच्या बेडमध्ये भरून घेणे. |
| ८) | पालापाचोळा, गवत भरलेल्या बेडवर गोठ्यातील मलमुत्रमिश्रीत पाणी मारणे. तसेच शेणाची स्लरी मारणे, त्याचप्रमाणे सदर बायोमास लवकर कुजण्यासाठी जीवामृत कल्चर ८ दिवसांनी मारणे. |
| ९) | गांडूळखत तयार झाल्यानंतर गांडूळखत गोळा करून ते चाळण्याचे काम करणे, गांडूखत चाळून झाल्यानंतर ठरावीक वजनाच्या पोत्यात भरून पॅकिंग करून ठेवणे. |

वरीलप्रमाणे कामे ठेका पध्दतीने दिनांक १५/०९/२०२३ ते २५/०३/२०२४ या कालावधीत करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये होणा–या मजूरीच्या एकुण रकमेचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक : ............... पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा–या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **“वाकवली विभाग प्रक्षेत्रामधील नारळ बागेत व गांडूळखत प्रकल्प युनिट येथे विविध कामे ठेका पध्दतीने करणे.”** असा उल्लेख करावा, लिफाफा बंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा–या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास

Scanned with OKEN Scanner

दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून संमतीपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुन्यामध्येच सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकाचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

- **उपरोक्त कामाच्या अटी व शर्ती:—**

१) ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरूप पाहुनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

२) ठेका मंजुरी आदेश प्राप्त होताच मंजुरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनानुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे. दरपत्रकासोबत पॅनकार्ड ची छायांकित प्रत जोडणे आवश्क आहे.

३) प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधीतकडे जमा करावयाचे आहे.

४) ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढिल ठेक्याच्या वेळी गृहित धरले जाणार नाही. ठेक्याबाबत करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रदद केला जाईल आणि ज्याबाब ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

५) ठेकेदाराकडे आधारकार्ड, पॅनकार्ड व बॅक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्यांचे बॅक खाती **NEFT/RTGS** धनाकर्षादवारे करण्यात येईल.

६) ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यासंबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

७) कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत व सुलकरण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

८) ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

९) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक **SLP-5443/90** नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेकाकालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१०)ज्याकंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रू. १००/— बॉण्ड पेपरवर करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

११) शासन निर्णयानुसार पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

१२) ठेकेदाराने ठेका पध्दतीवरील काम करणाऱ्या मजुरांना किमान दर. ४०९/— प्रति दिन या दराने किमान मजूरी अदा करावी तसे ठेकेदाराने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

१३) ठेकेदाराकडून ठेक्यावरील मजुरांचा अपघाता विमा काढणे बंधनकारक आहे तसे ठेकेदाराने प्रमाणित करणे गरजेचे आहे.

१४) विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र.बासाकोकृवि/आस्था/ब—५/३३६६/२०२३, दि. २५/०८/२०२३, अन्वये सर्व अटी व शर्ती ठेकेदारास बंधनकारक आहेत.

सोबतः—दरपत्रक मसुदा

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी

प्रत माहितीसाठी सादर...

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे,ता.दापोली/खेड.

Scanned with OKEN Scanner